अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | बुधवार, दि. १४ जून २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : २५५ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

## लोकप्रतिनिधी आणि सरकारी कर्मचाऱ्यांना म्हाडाचा दणका

### ११ टक्के घरांची तरतूद रद्द

मुंबई : लोकप्रतिनिधी, राज्य सरकारी कर्मचारी तसेच केंद्र सरकारी कर्मचारी आणि म्हाडाचे कर्मचारी यांना म्हाडाच्या गृहप्रकल्पात असलेले आरक्षण रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हे सर्व कर्मचारी आणि लोकप्रतिनिधी अत्यल्प गटात मोडत नसल्याने त्यांना ११ टक्के असलेले आरक्षण रद्द करून तृतीयपंथी व्यक्ती, अत्याचारपीडित महिला आणि असंघटित कर्मचाऱ्यांना देण्याचा निर्णय म्हाडाने घेतला आहे. या बाबतचा प्रस्ताव म्हाडाच्या मुंबई महामंडळाने राज्य सरकारकडे पाठवला आहे.

गेली अनेक वर्ष म्हाडाच्या निकषांमध्ये कोणताही बदल करण्यात आला नव्हता. २०२३ साली माजी लोकायुक्त सुरेशकुमार अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली होती. इतके वर्ष हा अहवाल धूळखात पडून होता. मात्र, आता अहवालातील काही शिफारशी लागू करण्याचे धोरण म्हाडाने स्वीकारले आहे. यानुसार म्हाडाने पाऊल उचलत म्हाडा कर्मचारी, केंद्र सरकारचे कर्मचारी आणि लोकप्रतिनिधींना असलेले २ टक्के आरक्षण रद्द करण्यात आले आहे. राज्य असर्कारी कर्मचाऱ्याने असलेले ५ टक्के आरक्षणही रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हे कर्मचारी अत्यल्प गटात बसत नसल्याने ते अर्ज करत नाहीत. त्यामुळे घरे रिकामीच राहतात.

# ‘नाड्या’ आवळल्या...

## ‘फौज’ तयार, ‘हातोडा’ पडणार

## चिमणी ‘मान’ टाकणार?

सुराज्य/सोलापूर

**गेल्या अनेक महिन्यांपासून चर्चेत असलेल्या सोलापूरच्या विमानसेवेला अडथळा ठरणारी चिमणी पाडण्यासाठी महापालिका आणि पोलीस प्रशासनाने युद्धपातळीवर तयारी सुरू केली आहे. महापालिकेने पाडकामासंदर्भात बुधवारपासून कारवाई सुरू करत असल्याची नोटीस महापालिकेने दिली आहे तर दुसरीकडे पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला आहे. कारखाना परिसरात कलम १४४ लागू करण्यात आला आहे. राज्य राखीव दलाच्या तुकड्यांनाही पाचारण करण्यात आले आहे. दुसरीकडे कारखान्यानेही याला जोरदार विरोध केला आहे. त्यामुळे बुधवारपासून पुढील काही दिवस शहरातील वातावरण तंग राहणार आहे.**



चिमणी पाडकामासंदर्भात सोलापूर महापालिका प्रशासनाने २७ एप्रिल रोजी कारखान्याची चिमणी स्वतःहून पाडून घेण्यासाठी ४५ दिवसांची दिलेली मुदत ११ जून रोजी समाप्त झाली आहे. पण कारखान्याने स्वतःहून चिमणी पाडली नाही. या उलट कारखाना स्थळावर शेकडो सभासद-शेतकरी जमवत प्रशासनावर दबाव टाकण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे आता महापालिका आणि पोलीस प्रशासनानेही कडक भूमिका घेतली आहे. महापालिकेने सिध्देश्वर कारखान्याच्या प्रशासकांना नोटीस बजावली आहे. पाडकामाची कार्यवाही बुधवारपासून सुरू करत असल्याची नोटीस महापालिकेने दिली आहे. स्वतः कारखान्याचे ज्येष्ठ संचालक धर्मराज काडादी यांनी ही नोटीस प्राप्त झाल्याची माहिती दिली.

### कारखाना परिसरात १४४ लागू

सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या एक किलोमीटरच्या परिघात कलम १४४ लागू करण्यात आले आहे. सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या एक किलोमीटरच्या परिघात अत्यावश्यक सेवा वगळता संचार करण्यास बंदी असणार आहे. कारखान्याच्या एक किलोमीटर परिसरात असलेले सर्व सभागृह, मंगल कार्यालय, रेस्टॉरंट, बार, हॉटेल धार्मिक स्थळ, प्रार्थना स्थळ बंद करण्याचे आदेश प्रशासनाने दिले आहेत. पुढील आदेशापर्यंत कलम १४४ लागू राहणार आहे. सोलापूर शहर पोलीस आयुक्त राजेंद्र माने यांनी हे आदेश जारी केले आहेत.

### कारखान्याकडे जाणारे मार्ग हत्तुरे वस्तीपासून बंद

पोलीस प्रशासनाने सिद्धेश्वर साखर कारखान्याकडे जाणारे मार्ग हत्तुरे वस्तीपासून बंद केले आहेत. दिनांक १३ जून ते १८ जून या सहा दिवस हत्तुरे वस्तीपासून पुढे सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याकडे कोणालाही जाता येणार नाही.मंगळवारी मध्यरात्रीपासून हा आदेश लागू करण्यात आला आहे. काही ठराविक वाहने आणि अत्यावश्यक सेवेतील वाहने वगळता इतरांना प्रवेश बंद करण्यात आला आहे. कारखाना ते कुंभारी हाही मार्ग बंद राहणार आहे.आयुक्त राजेंद्र माने यांनी मंगळवारी हा आदेश काढला.

### आजूबाजूच्या गावातही एसआरपच्या तुकड्या तैनात

कारखान्याच्या कामगारांचा आणि सभासदांचा चिमणी पाडकामास तीव्र विरोध होत असून त्यांनी देखील चिमणीला हात लावून दाखवाच असा पवित्र घेतल्याने पुन्हा एकदा वातावरण तापलेले आहे. मागील वेळी झालेला गोंधळ पाहता आणि एकूणच संवेदनशील परिस्थिती पाहता आता महापालिका आणि पोलीस प्रशासनाने आता संपूर्ण तयारीनिशी उतरण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार एसआरपीच्या अर्थात राज्य राखीव दलाच्या तुकड्या कारखाना परिसरासह आजूबाजूच्या गावात तैनात करण्याची तयारी केल्याची माहिती समोर आली आहे. कोणत्याही क्षणी कारखाना परिसर तसेच आजूबाजूच्या गावात पोलीस बंदोबस्त तैनात केला जाऊ शकतो, अशी परिस्थिती आहे.

### काय आहे चिमणीचा वाद?

सोलापूरच्या श्री सिद्धेश्वर सहकारी कारखान्याची ही को जनरेशन प्लांटची चिमणी आहे. २०१४ साली कारखान्याने ही चिमणी उभारलेली असून साधारण ९० मीटर इतकी उंची आहे. चिमणीच्या या उंचीमुळे शेजारी असलेल्या सोलापूर विमानतळावरून विमान सेवा सुरू करता येऊ शकत नाही असा अहवाल डीजीसीएने दिला होता. सोलापूरला विमानसेवा गरजेची असल्याने ही चिमणी हटवण्याची मागणी सोलापूर विकास मंच आणि सोलापूर विचार मंच या संघटनानी केली होती. त्यातच सोलापूर महानगरपालिकेने चिमणी अनधिकृत असल्याचे ठरविले. कारवाईच्या हालचाली सुरु केल्या.

### अडथळ्याचे फेरसर्व्हेक्षण सुरु : काडादी

डीजेसीएने त्यांचा यापूर्वीचा स्वतःचा निर्णय बदलून विमानसेवेतील अडथळ्यांचे फेरसर्व्हेक्षण नुकतेच सुरु केले आहे. हे सर्व्हेक्षण सूरु असताना चिमणीवर कारवाई करणे, योग्य ठरणार नाही. प्रशासनाने पाडकामाची घाई करु नये, असे कारखान्याचे मार्गदर्शक संचालक धर्मराज काडादी यांनी म्हटले आहे. दरम्यान चिमणीच्या कारवाईला विरोध करताना शेतकरी सभासदांनी अतताईपणा करु नये, कायदा हातात न घेता शांततेने आणि संयमाने विरोध करावा, असे आवाहन काडादी यांनी केले आहे.

## रोख रकमेसह सव्वादोन लाखाचे दागिने लंपास

सुराज्य/सोलापूर

जेवण करून घरात झोपले असता चोरट्याने कपाटातील रोख रकमेसह २ लाख २४ हजाराचे दागिने शिताफीने पळविले. ही धाडसी चोरी गुरसाळे (ता.माळशिरस) येथे मध्यरात्रीच्या सुमारास घडली. चोरट्याच्या आवाजाने घरातील लोक जागे झाले आणि चोरट्याचा पाठलाग केला. तो अंधाराच्या दिशेने पसार झाला.

यासंदर्भात सचिन जालिंदर नलवडे (रा. गुरसाळे) यांनी नातेपुते पोलिसात फिर्याद दाखल केली. ते रविवारी रात्रीच्या सुमारास जेवण करून आपल्या कुटुंबीयांसोबत घरात झोपले होते. सोमवारी मध्यरात्री साडेबारा वाजेच्या सुमारास आवाज आल्याने त्यांच्या पत्नीला जाग आली. तेव्हा एक अनोळखी इसम घरातून बाहेर जाताना दिसून आला. त्यांनी आरडाओरड केली. त्यानंतर सचिन नलावडे हे जागे होऊन चोरट्याचा पाठलाग केला. मात्र तो चोरीचा ऐवज घेऊन अंधाराच्या दिशेने पसार झाला. पुढील तपास हवालदार चौधरी करीत आहेत.

## सुनेवर बलात्कार; निवृत्त पोलीस अधिकाऱ्याविरुद्ध गुन्हा

सुराज्य/सोलापूर

घरातील आपल्या सुनेवर बलात्कार केल्याची घटना शहरात नुकतीच उघडकीस आली. या प्रकरणात विजापूर नाका पोलिसांनी निवृत्त डीवायएसपी याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

घटनेची वाच्यता करू नको म्हणून पिडितेस मारहाण केल्याप्रकरणी तिच्या पतीविरुद्ध देखील गुन्हा दाखल झाला आहे. सेवानिवृत्त डीवायएसपी असलेल्या आरोपींचा मुलगा हा शिक्षक असून त्याचा विवाह गेल्या वर्षी झाला होता. पिडिता ही महाविद्यालयीन शिक्षण घेत असल्यामुळे तिला तिचे सासरे



तिला वाहनातून ने आण करीत असत. १ ऑगस्ट ते ९ जून २०२३ या दरम्यान तिच्या सासऱ्याने लैंगिक चाळे करीत तिच्यावर दोन वेळा बळजबरीने अत्याचार केला होता. या कृत्याची माहिती पिडितेने आपल्या पतीला सांगितली होती. तेव्हा पतीने पिडीत पत्नीला मारहाण करून घरातून हाकलून दिले होते. त्यानंतर पिडिता माहेरी गेली. ती २ जून रोजी पुन्हा सासरी राहण्यासाठी आली.

तेव्हा घरातील सर्व लोक तिला एकटी सोडून निघून गेले. त्यानंतर ९ जून रोजी तिच्या आरोपी सासऱ्याने घरात येऊन तिला शिवीगाळ केली. आणि घरातून निघून जा नाहीतर तुला गोळ्या घालून ठार मारतो. अशी धमकी देत तिला घरात डांबून ठेवून निघून गेला होता. पोलिसांच्या मदतीने पिडितेची सुटका झाल्यानंतर तिने सासरे आणि पती विरुद्ध पोलिसात फिर्याद दाखल केली. पुढील तपास पोलीस निरीक्षक हनपुडे पाटील हे करीत आहेत.

## रेल्वेत प्रवेश करताना पाय घसरून पडल्याने एकाचा मृत्यू

सोलापूर : चालत्या रेल्वेत प्रवेश करताना पाय घसरून पडल्याने एक जण गंभीर जखमी होऊन उपचारा दरम्यान मयत झाला. ही दुर्घटना रेल्वे स्थानकातील प्लॅटफॉर्म क्रमांक ४ येथे सोमवारी रात्रीच्या सुमारास घडली.

इब्राहिम महबूबअली शेख (वय ४२ रा. धारावी, मुंबई. सध्या रा.मौलाली चौक सोलापूर) असे मयत झालेल्या इसमाचे नाव आहे. काल रात्री साडेआठ वाजेच्या सुमारास ते दादर एक्सप्रेस मध्ये प्रवेश करीत होते. त्यावेळी पाय घसरून खाली पडल्याने गंभीर जखमी झाले होते. त्यांना रेल्वे पोलिसांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले असता ते मंगळवारी सकाळी मयत झाले. या घटनेची नोंद रेल्वे पोलिसात झाली आहे.

## पाण्यात विष कालवल्याने गाय आणि म्हशीचा मृत्यू

### साखरेवाडी येथील घटना

सुराज्य/सोलापूर

हौदातील विष कालवलेले पाणी पिल्याने म्हैस आणि जर्सी गाय अशा दोघा जनावरांचा मृत्यू झाला.ही घटना साखरेवाडी (ता.उत्तर सोलापूर) येथे शनिवारी रात्रीच्या सुमारास घडली.

साखरेवाडी येथे नागराज तुकाराम पवार हे राहण्यास आहेत. ते रात्रीच्या सुमारास दूध काढण्यासाठी शेतात गेले होते. त्यावेळी त्यांची जर्सी गाय जमिनीवर पडलेली दिसून आली. गायीला उठवण्याचा प्रयत्न केले असता ती मयत झाल्याचे आढळले. त्यानंतर त्यांनी दुसऱ्या म्हशीला हौदातील पाणी पाजले. पाणी पिल्यानंतर म्हैस देखील थरथर कापत खाली कोसळली .म्हशीच्या तोंडातून फेस येऊ लागल्याने पवार यांनी जनावरांचा डॉक्टरांना बोलावून घेतले. डॉक्टरांनी दोन्ही जनावरांची तपासणी केली .आणि पाण्यातून विषबाधा झाल्याने जनावरे दगावल्याचे सांगितले. कोणीतरी अनोळखी इसमाने शेतातील जनावरांच्या हौदातील पाण्यात विष ओतल्याने हा प्रकार घडला. अशा आशयाची फिर्याद नागनाथ पवार यांनी तालुका पोलिसात दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी अनोळखी इसमाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

### आठ वर्षापूर्वीच्या गुरुनाथ कटारे खूनप्रकरणी

## रमेश पाटील यांची न्यायालयीन कोठडीत रवानगी

सुराज्य/सोलापूर

दक्षिण सोलापूर तालुक्यातील कुंभारी येथील तत्कालीन पंचायत समिती सदस्य गुरूनाथ कटारे यांचा दि. १३ ऑक्टोबर २०१४ रोजी माचर्ला मिलजवळ खून केल्याप्रकरणी दाखल गुन्हयात रमेश सिद्रामप्पा पाटील (रा. कुमठे, ता.अक्कलकोट) यास प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांनी न्यायालयीन कोठडीचे आदेश पारीत केले.




तब्बल आठ वर्षांनी संशयित रमेश पाटील हे पोलिसांच्या स्वाधीन झाले आहेत. याबाबतची हकिकत अशी की, दि. १३ ऑक्टोबर २०१४ रोजी रात्री गुरुनाथ कटारे हे मार्चला मिल जवळून त्यांच्या राहत्या घराकडे जात असताना, काही अज्ञात व्यक्तींनी त्यांच्यावर प्राणघातक शस्त्राने हल्ला करून त्यांचा खून तर नबीलाल शेख याच्यावर प्राणघातक हल्ला करून त्यास जखमी केले होते. अशा आशयाची फिर्याद घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार शिवलिंग पारशेट्टी याने वळसंग पोलीस ठाण्यात दिल्याने संबंधित आरोपींवर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या गुन्ह्याच्या तपासादरम्यान रमेश सिद्रामप्पा पाटील यांनी राजकीय फायदा मिळविण्याच्या हेतूने गुन्हयातील सहआरोपी प्रमोद स्वामी, जगदीश कोन्हेरीकर व प्रदीप मठपती यांच्यासोबत कट रचून खुनाची सुपारी दिल्याने सहआरोपींनी खून केल्याचे निष्पन्न झाले होते. तपासादरम्यान सहआरोपी प्रमोद स्वामी, जगदीश कोन्हेरीकर व प्रदीप मठपती यांना अटक करण्यात आली होती. त्यांच्याविरुद्ध गुन्हे अन्वेषण विभाग पुणे, यांनी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल होते. या खटल्याची सुनावणी होऊन सत्र न्यायालयाने त्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. या निकालास त्यांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. सुनावणीअंती उच्च न्यायालयाने प्रमोद स्वामी वगैरे यांना निर्दोष मुक्त केले होते. दरम्यान गुन्हा दाखल झालेले रमेश पाटील हे २०१४ पासून फरार होते. त्यानंतर दि. ७ जून २०२३ रोजी रमेश पाटील हे अक्कलकोट येथील न्यायालयात स्वत:हून हजर झाले. पोलिसांनी त्यांना न्यायालयात उभे केले होते. या गुन्ह्याचे तपास अधिकारी पोलीस उपअधीक्षक सरस्ते यांनी सात दिवस पोलीस कोठडीची मागणी केली होती. यावेळी न्यायालयात आरोपीतर्फे ॲड. मिलिंद थोबडे यांनी उच्च न्यायालयाने सहआरोपींना निर्दोष मुक्त करण्याच्या आदेशामध्ये हा गुन्हा शाबीत झालेला नसून खून करण्याचा कट देखील शाबीत झालेला नाही, असे निष्कर्ष नोंदविल्याचे सांगून पोलीस कोठडीस हरकत घेतली.

यावरून अक्कलकोट येथील न्यायालयाने रमेश पाटील यांना पाच दिवसांची पोलीस कोठडीचे आदेश दिले व त्यानंतर १२ जून २०२३ रोजी रमेश पाटील यांना पुन्हा न्यायालयात उभे केले असता तपास अधिकारी यांनी वाढीव पोलीस कोठडी देण्याची विनंती केली होती. तथापि, अक्कलकोट येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी आर. एस. एम शेख यांनी रमेश पाटील यास न्यायालयीन कोठडीचे आदेश दिले. यात रमेश पाटील यांच्यातर्फे ॲड. मिलिंद थोबडे, ॲड.अनिल मंगरूळे ,ॲड.राजकुमार मात्रे तर सरकारतर्फे ॲड. गिरीष सरवदे यांनी काम पाहिले.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



सध्या मी जास्तच जपून जाते, चल ठेवते...!

## पंढरपूरला जाणाऱ्या भाविकांसाठी टोल माफ; आजपासून स्टीकर्स मिळणार

सुराज्य/सोलापूर

पंढरपूरला जाणाऱ्या मानाच्या पालख्या, भाविक व वारकऱ्यांसाठी शासनाने दिलासा देणारा निर्णय घेतला आहे. आषाढी एकादशीनिमित्त वारकऱ्यांच्या गाड्यांना सार्वजनिक बांधकाम विभागाकडून टोलमाफिचा निर्णय जाहीर करण्यात आला आहे. टोलमाफिचे स्टिकर्स हे पोलीस स्टेशन, वाहतूक पोलीस चौक्यांमधून देण्यात येणार आहे.

आषाढी वारीसाठी पंढरपूरला जाणाऱ्या पालख्या तसेच भाविकासाठी, वारकऱ्यांसाठीच्या सोयी-सुविधा, त्यांच्या वाहनांना टोल माफ करण्याबाबत राज्य सरकारने १ जून २०२३ रोजी निर्णय घेतला होता. त्याच अनुषंगाने मंगळवारी सार्वजनिक बांधकाम विभागाने टोलमाफिबाबतचे आदेश जारी केले आहेत. गाडी क्रमांक, चालकाचे नाव असा मजकूर नमूद करून आवश्यक त्या संख्येनुसार स्टिकर्स पुरवण्याचे निर्देश परिवहन विभागाला देण्यात आले आहेत. पंढरपूरला जाणाऱ्या पालख्या, भाविक वारकऱ्यांना आषाढी एकादशी २०२३, गाडी क्रमांक, चालकाचे नाव असा मजकूर नमूद करून आवश्यक त्या संख्येने नुसार स्टिकर्स परिवहन विभाग, वाहतूक पोलीस, पोलीस, संबंधित आर. टी. ओ यांच्याशी समन्वय साधून पोलीस स्टेशन्स, वाहतूक पोलीस चौक्या, आरटीओमध्ये अर्थात टोलमाफिचे स्टिकर्स उपलब्ध करण्यात आले आहेत. आषाढी एकादशीनिमित्ताने असणाऱ्या पंढरपूरच्या वारीच्या निमित्ताने टोल नाक्यावर स्वतंत्र पोलीस यंत्रणा ठेवण्याच्या सूचना करण्यात आली आहे. त्याशिवाय, परिवहन विभागालादेखील जादा बसेस सोडण्यास सांगण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्यातून पंढरपूरकडे येणारे सर्व टोल नाक्यांवर उपरोक्त कालावधीत टोल माफि नसलेल्या महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसना टोलमधून सूट द्यावी, असे ठरले आहे. त्यामुळे एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी गरजेप्रमाणे संबंधित पोलीस ठाण्याकडून टोल माफिसाठीचे कुपन, पास घ्यावे असे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान महाराष्ट्रभरातून पंढरपूरला जाणाऱ्या सर्व रस्त्यांवरील खड्डे भरणे, दुरुस्ती करणे, सूचना फलक लावणे आदी कामे पूर्ण करण्याची सूचना सार्वजनिक बांधकाम विभागाने केली आहे.




### कधीपर्यंत सवलत?

पंढरपूरला जाताना आणि पुन्हा पंढरपूरवरून येताना १३ जून २०२३ पासून ते ३ जुलै २०२३ पर्यंच टोलमाफीची सवलत लागू असणार असल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाने दिली आहे. ही सवलत पालखी, भाविक आणि वारकऱ्यांच्या हलक्या जड व वाहनांसाठीच असणार आहे.

### मंदिर समितीकडून १५ लाख लाडू

भाविकांना विठुरायाच्या प्रसाद म्हणून अल्पावधीत अतिशय लोकप्रिय झालेल्या बुंदीच्या लाडूला भाविकांतून असलेली मागणी पाहून या वर्षी मंदिर समितीने १५ लाख लाडू बनविण्यास सुरुवात केली आहे. यंदा विक्रमी आषाढी यात्रा भरण्याचे संकेत पाहता गरज पडल्यास आणखी ५ लाख लाडू बनविण्याची तयारी केल्याचे मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी आणि जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे यांनी सांगितले.

| कल्याण |
| --- |
| 368-78-459 |

| मेन बाजार |
| --- |
| 158-43-229 |